**पुणे मेट्रोचे बुधवार पेठ येथे भूमिगत बोगद्याचे काम पूर्ण.**

**पुणे मेट्रोने TBM द्वारे १२ किमी भूमिगत मेट्रो टनेलिंगचे काम पूर्ण केले.**

आज, ४ जून २०२२ रोजी, पुणे मेट्रो प्रकल्पाच्या स्वारगेट ते बुधवार पेठ या भूमिगत मार्गाच्या बोगद्याच्या शेवटच्या टप्प्याचे काम पूर्ण होत आहे. TBM मुळा-२ ने बुधवार पेठ मेट्रो स्थानकावर ब्रेक थ्रू करण्यात यश मिळवले. ५ सप्टेंबर २०२१ रोजी स्वारगेट पासून सुरु झालेले खोदकाम मंडई स्थानक ओलांडून बुधवार पेठ येथे 2.025 किमी बोगदा तयार करून अंदाजे 10 महिन्यांत बाहेरपूर्ण होत आहे. पुणे मेट्रोने गाठलेला हा टप्पा म्हणजे एकूण १२ किमी लांबीच्या भूमिगत बोगद्याचे 100% काम पूर्ण झाले आहे.

पुणे मेट्रोला एकूण ३३.२ किमी लांबीचे दोन कॉरिडॉर आहेत. एक वनाज ते रामवाडी जी एक उन्नत लाईन आहे आणि दुसरी पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट जी पिंपरी-चिंचवड ते कृषी महाविद्यालय पर्यंत उन्नत आहे आणि त्यानंतर स्वारगेट पर्यंत भूमिगत आहे. भूमिगत विभाग सुमारे ६ किमी आहे आणि या भागामध्ये शिवाजी नगर, दिवाणी न्यायालय, बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट भूमिगत मेट्रो स्थानके आहेत.

भूमिगत विभागात अप आणि डाऊन मेट्रो ट्रेनसाठी दोन समांतर बोगद्यांचा समावेश आहे. ६ किमी बोगद्याच्या कामासाठी तीन टीबीएम वापरण्यात आले. या टनेल बोअरिंग मशिन्सना (टीबीएम) पुण्यातील नद्यांची नावे देण्यात आली आहेत. मुळा, मुठा आणि पवना. या TBM द्वारे केले जाणारे बोगदे खालीलप्रमाणे आहेत:

| TBM | From | To |
|---|---|---|
| Mutha | Agriculture College | Budhwar Peth |
| Mula- I | Agriculture College | Budhwar Peth |
| Pavana | Swargate | Budhwar Peth |
| Mula- II<br>(Mula- I has been reused and names as Mula-II) | Swargate | Budhwar Peth |

जेव्हा TBM बोगद्याचे काम पूर्ण करते आणि स्टेशन शाफ्टवर येते, तेव्हा या घटनेला ब्रेकथ्रू असे संबोधले जाते. सध्याची घटना म्हणजे पुणे मेट्रोचे शेवटचे ब्रेकथ्रू आहे. भूतकाळात ५ ब्रेकथ्रू झाले होते, तपशील खाली दिले आहेत.

| **Breakthrough Details (mm/dd/yy)** | | | |
|---|---|---|---|
| **Sr.No** | **Location** | **Up Line Date** | **Down Line Date** |
| 1 | Civil Court | 9/28/2020 | 11/7/2020 |
| 2 | Budhwar Peth | 7/23/2021 | 7/14/2021 |
| 3 | Budhwar Peth | | 1/14/2022 |

पुणे मेट्रो प्रकल्पाचा भुयारी भाग हा अत्यंत आव्हानात्मक आणि महत्त्वाचा भाग आहे. पुणे मेट्रोसाठी भूमिगत काम करणारा कंत्राटदार M/s Tata-Gulermark ने प्रशंसनीय काम केले आहे. तांत्रिक कौशल्य आणि ठोस प्रकल्प व्यवस्थापनामुळे बोगद्याचे काम कोणत्याही अडचणीशिवाय पूर्ण झाले आहे. बोगद्याचे काम पूर्ण झाल्यामुळे ट्रॅक, सिग्नलिंग आणि ट्रॅक्शनच्या कामासाठी मार्ग मोकळा झाला आहे.

या अंतिम यशाबद्दल, महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित म्हणाले, “पुणे मेट्रोच्या बोगद्याचे काम अत्यंत अचूक आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाने करण्यात आले. ही अंतिम प्रगती १२ किमी बोगदा मार्ग पूर्ण झाल्याची खूण करते आणि महा मेट्रोसाठी हा अतिशय अभिमानाचा क्षण आहे. पुण्यातील नागरिक आणि प्रशासकीय संस्थांच्या सक्रिय पाठिंब्याशिवाय पुणे मेट्रो प्रकल्पाच्या भूमिगत मार्गाचे काम वेगाने आणि यशस्वीपणे पूर्ण झाले नसते. वेळेत काम पूर्ण करण्यासाठी महा मेट्रो कटिबद्ध आहे.”